2 8 NOV 2025

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात उद्या 'स्त्री मुक्ती परिषद'

कोल्हापूर, ता. २७ : स्त्री मुक्ती चळवळीला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठात शनिवारी (ता. २९) स्त्री मुक्ती परिषद होणार आहे. या परिषदेचे उद्‍घाटन सकाळी साडेदहा वाजता विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते होणार आहे. शारदा साठे यांचे बीजभाषण होईल.

या परिषदेत स्त्री-पुरुष समानतेच्या दिशेने, पुरुषभान, हिंसाचार-मानसिक, सामाजिक या विषयांवर चर्चासत्र होणार आहे. त्यात प्रा. डॉ. भारती पाटील, डॉ. माया पंडित, अमोल केरकर, मिलिंद चव्हाण, प्रसाद कुलकर्णी, सुधाकर भदरगे, तनुजा शिपूरकर, मयुरी आळवेकर, सुनीता पाटील, शोभा कोकितकर सहभागी होणार आहेत. 'स्त्रिया व अंधश्रद्धा' या विषयावर कोल्हापूर अंनिसचे कार्यकर्ते 'ऐसे कैसे झाले भोंदू?' ही नाटिका सादर करणार असल्याची माहिती स्त्री मुक्ती परिषदेच्या छाया राजे आणि शारदाबाई पवार अध्यासनाच्या प्रा. डॉ. भारती पाटील यांनी दिली.

2 8 NOV 2025
तरुण भारत

# विद्यापीठाच्या परीक्षेत तब्बल ४२ गैरप्रकाराची नोंद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर नोव्हेंबर – २०२५ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या गुरूवारी झालेल्या परीक्षेत तब्बल ४२ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे. यामध्ये कोल्हापूर विभागातून सर्वाधिक ३८ गैरप्रकार झाल्याचे समोर आले आहे. तसेच सांगली विभागात १ तर सातारा विभागात ३ गैरप्रकार झाले आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षा ०३ नोव्हेंबरपासून सुरु झालेल्या आहेत. गुरूवारी विविध ७५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने पार पडल्या. गुरूवारी एकूण ४० हजार ०७५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. विविध १८३ परीक्षा केंद्रावर परीक्षा झाली. गुरूवारी २० अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आलेले असून आजअखेर ४४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर झाले आहेत. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने भरारी पथके स्थापन केली आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

2 8 NOV 2025

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाला सुवर्ण, दोन रौप्य, तीन कास्य

## खेलो इंडिया स्पर्धेत धमाकेदार कामगिरी

कोल्हापूर : प्रतिनिधी

'खेलो इंडिया युनिव्हर्सिटी २०२५' मध्ये शिवाजी विद्यापीठाने एक सुवर्ण, दोन रौप्य आणि तीन कास्यपदके मिळवून धडाकेबाज सुरुवात केली आहे. राजस्थानमधील एकूण ७ शहरांमध्ये ५ व्या 'खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स २०२५' सुरू आहे. यामध्ये देशातील २०० विद्यापीठांमधून पाच हजाराहून अधिक खेळाडू सहभागी झाले आहेत.

यामध्ये २३ क्रीडा प्रकार व एक प्रायोगिक तत्त्वावर खो-खो हा खेळ असे २४ खेळांची स्पर्धा होत आहे. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या एकूण १० खेळ प्रकारांत ▶▶ पान ७ वर....

## शिवाजी विद्यापीठाला सुवर्ण, दोन रौप्य, तीन कास्य

सहभाग असून, यामध्ये ८७ खेळाडू, १७ संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक आणि प्रा. डॉ. एन. डी. पाटील हे पथकप्रमुख म्हणून सहभागी झाले आहेत. या स्पर्धा अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेमधील जे पहिले ८ संघ असतात, त्यांच्यामध्येच असल्याने अत्यंत चुरशीची व ऑलिम्पिकच्या दृष्टीने पहिली पायरी म्हणून या स्पर्धेकडे पाहिले जाते.

दि. २४ नोव्हेंबर ते ५ डिसेंबरअखेर ही स्पर्धा चालणार आहेत. स्पर्धेच्या दुसऱ्याच दिवशी वेटलिफ्टिंग क्रीडा प्रकारात काजोल सरगर हिने सुवर्णपदकासह विद्यापीठाचे खाते उघडले. त्यानंतर मुलांच्या १० मी. एअर रायफल शूटिंग संघाने कास्यपदक मिळवले. संघामध्ये प्रतीक जोंग, अथर्व पाटील व रणवीर काटकर यांचा समावेश होता. आर्चरी पुरुष वैयक्तिक रिकव्हर (५० मीटर) प्रकारात साहिल शेलार याने रौप्यपदक मिळवले, तर अत्यंत चुरशीने झालेल्या पुरुष रिकव्हर टी-इव्हेंटमध्ये शिवाजी विद्यापीठ विरुद्ध लवली प्रोफेशनल विद्यापीठ अत्यंत चुरशीच्या सामन्यात अवघ्या एक गुणाने ५८-५७ असा अंतिम सेट लवली प्रोफेशनलने जिंकल्यामुळे शिवाजी विद्यापीठास रौप्यपदक प्राप्त झाले. या संघामध्ये मयूर रोकडे, साहिल शेलार, आदित्य जाधव व प्रणव मालवेकर या खेळाडूंचा समावेश होता. कुस्ती प्रकारात शिवाजी विद्यापीठाची पैलवान सृष्टी भोसले व समृद्धी घोरपडे यांनी आपापल्या वजनी गटामध्ये कास्यपदक पटकावले.

2 8 NOV 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्या स्त्रीमुक्ती परिषद

कोल्हापूर : स्त्री मुक्ती चळवळीला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमिताने महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद व शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. २९ रोजी स्त्री मुक्ती परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात ही परिषद होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते परिषदेचे उद्‌घाटन होणार आहे. पहिल्या सत्रात सकाळी ११.३० ते १२.३० दरम्यान स्त्री-पुरुष समानतेच्या दिशेने या विषयावर प्रा. डॉ. भारती पाटील, प्रा. डॉ. माया पंडित मार्गदर्शन करणार आहेत. दुसऱ्या सत्रात पुरुषभान या विषयावर पुण्याचे मिलिंद चव्हाण मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी २.३० ते ३.३० वाजता अंनिसच्यावतीने स्त्रिया व अंधश्रद्धा या विषयावर नाटीका सादर होणार आहे. दुपारी ३.३० ते ४.३० च्या सत्रात हिंसाचार : मानसिक व सामाजिक या विषयावर मार्गदर्शन होणार आहे.

2 8 NOV 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची दमदार सुरुवात

## खेलो इंडिया स्पर्धेत सहा पदकांची कमाई : १० खेळांमध्ये सहभाग

कोल्हापूर, ता. २७ : राजस्थान येथे सुरू असलेल्या पाचव्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने दमदार सुरुवात केली आहे. स्पर्धेच्या पहिल्या तीन दिवसांत एक सुवर्ण, दोन रौप्य आणि तीन ब्राँझ पदकांची कमाई केली. स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा १० खेळ प्रकारांत सहभाग असून, यामध्ये ८७ खेळाडू, १७ संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक आहेत. प्रा. डॉ. एन. डी. पाटील हे पथक प्रमुख म्हणून काम पाहत आहेत.

वेटलिफ्टिंग स्पर्धेत काजोल सरगरने सुवर्ण, मुलांच्या १० मी. एअर रायफल शूटिंग संघाने ब्राँझ पदक पटकावले. या संघामध्ये प्रतीक जोग, अथर्व पाटील व रणवीर काटकर या खेळाडूंचा समावेश




राजस्थान : येथे सुरू असलेल्या पाचव्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये शिवाजी विद्यापीठ संघाच्या सहभागी खेळाडूंसह प्रा. डॉ. एन. डी. पाटील.

होता. त्याचबरोबर आर्चरी पुरुष वैयक्तिक रिकव्हर (५० मीटर) प्रकारात साहिल शेलार याने रौप्यपदक पटकावले. अत्यंत चुरशीने झालेल्या पुरुष रिकव्हर टी-इव्हेंटमध्ये शिवाजी विद्यापीठ विरुद्ध लवली प्रोफेशनल विद्यापीठ यांच्यात झालेल्या अत्यंत चुरशीच्या सामन्यात अवघ्या एक गुणाने ५८-५७ असा अंतिम सेट लवली प्रोफेशनलने जिंकल्यामुळे शिवाजी विद्यापीठास रौप्य पदकावर समाधान मानावें लागले. या संघामध्ये मयूर रोकडे, साहिल शेलार, आदित्य जाधव व प्रणव मालवेकर या खेळाडूंचा समावेश आहे.

कुस्तीमध्ये सृष्टी भोसले व समृद्धी घोरपडे यांनी आपापल्या वजनीगटात ब्राँझपदक पटकावले. खेळाडूंना सहभागी प्रशिक्षक संघ व्यवस्थापक डॉ .सुनील खराडे, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. धनंजय पाटील, डॉ. प्रताप जाधव, डॉ. नीलेश पाटील, डॉ. इब्राहिम मुल्ला, डॉ. आकाश बनसोडे, डॉ. टी. आर. साबळे, डॉ. विक्रमसिंह नांगरे-पाटील, डॉ. शीला मोहिते, रामचंद्र पाटील, शिवाजी दाभाडे, वर्षा शिंदे, दीपक पाटील, सचिन जाधव, सुहास वाघ, अजय मराठे यांचे मार्गदर्शन लाभले.

28 NOV 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाला शूटिंगमध्ये कांस्यपदक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जयपूर (राजस्थान) येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स-२०२५ मध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने गुरुवारी शूटिंगमध्ये कांस्यपदक मिळवले. विद्यापीठाचे खेळाडू रणवीर अजितसिंह काटकर, अथर्व गंगाराम पाटील ( दोघेही, डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, कोल्हापूर), प्रतीक आनंदा जोंग (नाईट कॉलेज, कोल्हापूर) यांनी १० मीटर एअर रायफल टीम या प्रकारात १८६८.८ इतक्या गुणांसह कांस्यपदक पटकावले.

या खेळाडूंना विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यापीठ पथकप्रमुख डॉ. एन. डी. पाटील यांचे प्रोत्साहन आणि प्रशिक्षक डॉ. धनंजय पाटील, सचिन जाधव, शिवाजी दाभाडे यांचे मार्गदर्शन लाभले.



जयपूर (राजस्थान) येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स-२०२५ मध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने गुरुवारी शूटिंगमध्ये कांस्यपदक मिळवले.

## आर्चरीत रौप्यपदक

पाचव्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स-२०२५ मध्ये तिरंदाजीतही (आर्चरी) शिवाजी विद्यापीठाच्या साहिल शेलार याने रौप्यपदक प्राप्त केले. साहिलने या पदकासोबतच रिकर्व्ह (पुरुष) या आर्चरी खेळ प्रकाराच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्याला प्रशिक्षक डॉ. समीर पवार, शिवाजी दाभाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

2 8 NOV 2025

तरूण भारत




कोल्हापूर : खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स-२०२५ मधील नेमबाजी स्पर्धेत कांस्य पदक जिंकलेल्या विद्यापीठाच्या संघासोबत प्रशिक्षक प्रशिक्षक डॉ. धनंजय पाटील, सचिन जाधव.

# शिवाजी विद्यापीठ संघाला नेमबाजीमध्ये कांस्य पदक

- खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समधील नेमबाजी स्पर्धेत कामगिरी

प्रतिनिधी
कोल्हापूर

जयपूर (राजस्थान येथे) खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स-२०२५ अंतर्गत झालेल्या नेमबाजी स्पर्धेतील १० मीटर एअर रायफल या प्रकारात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने कांस्य पदक मिळवले. पदकाला गवसणी घालताना संघाने १८६८.८ इतकी गुणांची कमाई केली. अथर्व गंगाराम पाटील, रणवीर अजित सिंह काटकर (दोघे डी. वाय. पाटील इंजीनियरिंग कॉलेज, कोल्हापूर) प्रतिक आनंदा जोंग (नाईट कॉलेज) अशी पदक विजेत्या शिवाजी विद्यापीठाच्या संघात नेमबाजांची नावे आहेत.

गतवर्षी चंदीगड येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत अथर्व, रणवीर आणि प्रतिक यांच्याच संघाने १० मीटर एअर रायफल या प्रकारात कांस्य पदक जिंकले होते. या कामगिरीची दखल घेऊन या तिघांच्या संघाची जयपूर (राजस्थान येथे) सुरु असलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स-२०२५ मधील नेमबाजी स्पर्धेसाठी निवड केली होती.

या संघाला प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू प्रा डॉ ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे विद्यापीठ, पथक प्रमुख प्रा. डॉ. एन. डी. पाटील, प्रशिक्षक डॉ. धनंजय पाटील, सचिन जाधव, संघ व्यवस्थापक प्रा. शिवाजी दाभाडे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

2 8 NOV 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाला खेलो इंडिया शूटिंग स्पर्धेत कांस्यपदक

**कोल्हापूर :** जयपूर (राजस्थान) येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स २०२५ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने कांस्यपदकाची कमाई केली. संघातील अथर्व गंगाराम पाटील व रणवीर अजितसिंह काटकर (डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज) आणि प्रतीक आनंदा जोंग (नाईट कॉलेज) यांच्या संघाने १० मीटर एअर रायफल प्रकारात टीम या प्रकारात १८६८.८ गुण मिळवून तृतीय क्रमांकासह कांस्यपदक पटकावले. या सर्वांना शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र. कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे, पथक प्रमुख प्रा. डॉ. एन. डी. पाटील, प्रशिक्षक डॉ. धनंजय पाटील, सचिन जाधव, प्रा. शिवाजी दाभाडे यांचे मार्गदर्शन लाभले.



2 8 NOV 2025

पुढारी

# विद्यापीठात संविधान दिन व शहीद दिनानिमित्त विविध कार्यक्रम

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठात बुधवारी संविधान दिन आणि शहीद दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत संविधान दिनानिमित्त संविधान प्रास्ताविकेस अभिवादन करण्यात आले. त्याचप्रमाणे यावेळी सामूहिक वाचन करण्यात आले.

डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविकेचे वाचन केले. त्यानंतर मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये शहीद झालेले पोलिस अधिकारी आणि जवान यांच्या प्रतिमांना पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, आजीवन अध्ययन केंद्राचे डॉ. रामचंद्र पवार, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. प्रमोद पांडव, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

2 8 NOV 2025

पुढारी

# ‘विवेकानंद’ला इंटर झोनल महिला, पुरुष बॅडमिंटन स्पर्धेमध्ये दुहेरी मुकुट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग, आष्टा यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठ अंतर्गत इंटर झोनल महिला व पुरुष बॅडमिंटन स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूरच्या महिला व पुरुष बॅडमिंटन संघाने प्रथम क्रमांक मिळवत दुहेरी मुकुटाचे मानकरी ठरले आहेत.

खेळाडूंना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण यांचे मार्गदर्शन लाभले.

2 8 NOV 2025
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimiti Corner Appartment, Kolhapur.
Mob - 9175089609

# शिवाजी विद्यापीठात संविधान दिन व शहीद दिन

**कोल्हापूर : ( महान्यू अँड व्ह्यूज):**

शिवाजी विद्यापीठात आज संविधान दिन आणि शहीद दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत संविधान दिनानिमित्त संविधान प्रास्ताविकेस अभिवादन करण्यात येऊन प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविकेचे वाचन केले. त्यानंतर मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये शहीद झालेले शूर पोलीस अधिकारी आणि जवान यांच्या प्रतिमांना पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले.




यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, आजीवन अध्ययन केंद्राचे डॉ. रामचंद्र पवार, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. प्रमोद पांडव, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

2 8 NOV 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# यशवंतराव चव्हाण यांना विद्यापीठात आदरांजली



**कोल्हापूर (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज):**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट येथे यशवंतराव चव्हाण अध्यासनातर्फे त्यांना आदरांजली वाहण्यात आली. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. नितीन माळी, अध्यासनाचे समन्वयक डॉ. गजानन साळुंखे, डॉ. सुधीर देसाई, डॉ. अमोल मिणचेकर, डॉ. वैशाली भोसले, डॉ. कविता वड्राळे, डॉ. संतोष सुतार, श्री. चेतन गळगे आदींसह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 8 NOV 2025

महा न्यूज & व्ह्यूज




# विद्यापीठाला 'खेलो इंडिया'त शूटिंगमध्ये कांस्य, आर्चरीत रौप्यपदक

**कोल्हापूर (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज):**

जयपूर (राजस्थान) येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स- २०२५ मध्ये शिवाजी विद्यापीठाला आज शूटिंगमध्ये कांस्यपदक प्राप्त झाले.

विद्यापीठाचे खेळाडू रणवीर अजितसिंह काटकर (डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, कोल्हापूर), अथर्व गंगाराम पाटील (डी. वाय. पाटील इंजीनियरिंग कॉलेज, कोल्हापूर), प्रतीक आनंदा जोंग (नाईट कॉलेज, कोल्हापूर) यांनी १० मीटर एअर रायफल टीम या प्रकारात १८६८.८ इतक्या गुणांसह कांस्य पदक पटकावले.

या खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यापीठ पथकप्रमुख डॉ. एन.डी. पाटील यांचे प्रोत्साहन आणि प्रशिक्षक डॉ. धनंजय पाटील, सचिन जाधव, शिवाजी दाभाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

**विद्यापीठाला आर्चरीत रौप्यपदक**

जयपूर (राजस्थान) येथे सुरू असलेल्या पाचव्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स-२०२५ मध्ये तिरंदाजीतही (आर्चरी) शिवाजी विद्यापीठाच्या साहिल शेलार याने रौप्यपदक प्राप्त केले. साहीलने या पदकासोबतच रिकव्हर (पुरुष) या आर्चरी खेळ प्रकाराच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्याला प्रशिक्षक डॉ. समीर पवार, शिवाजी दाभाडे यांचे मार्गदर्शन लाभले.